[ १९९६] २ एस. सी. आर.

नगरपालिका समिती, बहादूरगड

- विरुद्ध -

क्रिष्णन बेहारी आणि इतर

१९ फेब्रुवारी, १९९६

[न्यायमूर्ती बी. पी. जीवन रेड्डी आणि न्यायमूर्ती के. एस. परीपूरनन]

*सेवा नियम :*

*रोख रकमेची अफरातफर आणि बनावट खाती केल्याबद्दल महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याला सेवेतून बडतर्फ करण्यात आले-कर्मचाऱ्यावर खटला चालवण्यात आला आणि त्याला दोषी ठरवण्यात आले-विभागीय अपीलात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संचालकांनी शिक्षा कमी करून चार वेतनवाढींवर स्थगिती आणली-तसेच निर्देश दिले की ज्या कालावधीत कर्मचारी सेवेबाहेर होता ती कालावधी असाधारण रजा म्हणून मानली जावी -आयुक्त आणि उच्च न्यायालयाकडील अपील फेटाळण्यात आल्या-* अपील दाखल केल्यावर असा निर्णय देण्यात आला की, *भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये बडतर्फ करण्याशिवाय इतर कोणतीही शिक्षा होऊ शकत नाही-अशा प्रकरणात दाखवलेली कोणतीही सहानुभूती पूर्णपणे अनावश्यक आणि जनहिताविरुद्ध आहे.*

**दिवाणी अपिलीय अधिकार क्षेत्र : दिवाणी अपील क्र. ४१२०/१९९६**

दिनांक १८/०४/१९९४ रोजी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने क्रमांक ४७६९/१९९४ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी श्री. ए. पी. मेध

उत्तरवादी व्यक्तिश: हजर आणि उत्तरवादींसाठी सुश्री इंदू मल्होत्रा

न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश दिले :

परवानगी दिली.

उत्तरवादी हा नगरपालिकेत कारकून होता. त्याच्यावर बनावट खाती करून १५४८.७८ रुपयांची अफरातफर केल्याचा आरोप होता. त्याच्यावर फौजदारी खटला चालवण्यात आला आणि भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९ अंतर्गत त्याला दोषी ठरवण्यात आले. अपील

केल्यावर, दोषसिद्धी भारतीय दंड संहितेच्या कलम ४०९ वरून कलम ४६८ मध्ये बदलण्यात आली. कलम ४६८ पुढीलप्रमाणे आहे :-

" जो कोणी बनावट दस्तऐवज फसवणुकीच्या उद्देशाकरिता वापरले जाईल या हेतूने बनावटगिरी करतो त्याला ७ वर्षांपर्यंतच्या कालावधीसाठी कोणत्याही प्रकारच्या कारावासाची शिक्षा केली जाईल आणि दंडसुद्धा भरावा लागेल".

सदर शिक्षा लक्षात घेऊन नगरपालिका समितीने उत्तरवादीला बडतर्फ केले. उत्तरवादीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संचालकांसमोर अपील दाखल केले, ज्यांनी कारवाईची योग्यता कायम ठेवून, शिक्षा कमी करून चार वेतनवाढ थांबवली आणि ज्या कालावधीत उत्तरवादी सेवेबाहेर होता ती कालावधी असाधारण रजा म्हणून मानली जाईल असेही निर्देश दिले होते. नगरपालिका समितीने आयुक्तांकडे दाखल केलेली याचिका अक्षम म्हणून फेटाळण्यात आली. नगरपालिका समितीने दाखल केलेली रिट याचिका देखील उच्च न्यायालयाद्वारे आरंभीच फेटाळण्यात आली होती.

हे स्पष्ट आहे की उत्तरवादीला गंभीर गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आले आहे आणि हे राज्यघटनेच्या अनुच्छेद ३११ (२) मधील परंतुक (ए) लागू होण्यास एक स्पष्ट प्रकरण आहे. खरोखरच, अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये बडतर्फ करण्याशिवाय इतर कोणतीही शिक्षा होऊ शकत नाही. अशा प्रकरणांमध्ये दाखवलेली कोणतीही सहानुभूती पूर्णपणे अनावश्यक आणि जनहिताविरुद्ध आहे. अफरातफर केलेली रक्कम कमी किंवा जास्त असू शकते; परंतु अफ़रातफरीचे जे कृत्य आहे ते प्रासंगिक आहे. अशा प्रकरणात लक्षात ठेवण्यासारख्या संबंधित घटकांचे चुकीचे आकलन करून संचालकांनी शिक्षेत हस्तक्षेप केला होता.

तदनुसार सदर अपील मंजूर केली जाते. उच्च न्यायालय, आयुक्त आणि संचालक यांनी दिलेले न्यायनिर्णय रद्द केले जातात आणि उत्तरवादीला बडतर्फ करण्याचा नगरपालिका समितीचा आदेश पुनर्संचयित केला जातो.

कोणतेही खर्च नाही.

जी. एन. अपील मंजूर.